**वाचले:** १. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन आदेश जा.क्र. बी/एडीएम/०३/६९८९/२०२५, दिनांक २८/०८/२०२५.
२. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन पत्र जा.क्र. बी/एडीएम/०३/७०६३/२०२५, दिनांक ३०/०८/२०२५.
३. दिवाणी न्यायालय क. स्तर, दहिवडी यांचेकडील जा. क्र. २५८२/२०२५ दिनांक ०९/०९/२०२५ रोजीचे पत्र.
४. श्री. विक्रम दिलीप काकडे, मु.पो. कोरेगांव जि. सातारा यांचा दिनांक ०९/०९/२०२५ रोजीचा विनंती अर्ज.

-०-०-०-

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे आदेशान्वये श्री. विक्रम दिलीप काकडे, मु.पो. शिंदे कॉलनी, कुमठेफाटा, कोरेगांव, ता. कोरेगांव जि. सातारा यांची दिवाणी न्यायालय क. स्तर, दहिवडी येथे तदर्थ हंगामी स्वरुपात प्रथम नियुक्तीने कनिष्ठ लिपीक पदावर नेमणूक करणेत आली आहे. त्यास अनुसरुन श्री. विक्रम दिलीप काकडे यांना संदर्भ क्र. २ चे नियुक्ती पत्र निर्गमीत करणेत येऊन त्यांना नियुक्ती पत्र मिळालेचे दिनांकापासून सात दिवसाचे आंत नेमणूकीचे ठिकाणी हजर होणेस निर्देशीत केले होते. सदरील नियुक्तीपत्र श्री. काकडे यांना दिनांक ०१/०९/२०२५ रोजी प्राप्त होऊनही ते कर्तव्यावर रुजू झाले नाहीत. श्री. काकडे दिनांक ०९/०९/२०२५ रोजी दिवाणी न्यायालय क. स्तर, दहिवडी येथे स्वतः उपस्थित होऊन संदर्भ क्र. ४ चे अर्जान्वये त्यांचे नियुक्तीस मुदत वाढ मिळणेची विनंती केली आहे. यास अनुसरुन निम्नस्वाक्षरीतकार खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

## कार्यालयीन आदेशः-

उपरोक्त संदर्भ क्र. २ चे नियुक्ती पत्रात नमुद केलेनुसार कनिष्ठ लिपीक पदाचे निवड यादीमधील अ.नं. ५६ येथील उमेदवार श्री. विक्रम दिलीप काकडे यांनी दिवाणी न्यायालय क. स्तर, दहिवडी येथे त्यांचे कनिष्ठ लिपीक पदाचा कार्यभार मुदतीत स्विकारला नाही. तथापी त्यांनी सादर केलेल्या विनंती अर्जातील कथन विचार करणे योग्य असल्याने श्री. विक्रम दिलीप काकडे यांचे नियुक्तीस या आदेशाच्या दिनांका पासून ५ दिवसांची मुदत वाढ देणेत येत आहे.

श्री. विक्रम दिलीप काकडे यांना सुचित करणेत येते की, त्यांचे नियुक्तीस देणेत आलेल्या वाढीव कालावधीत नियुक्तीचे ठिकाणी स्वखर्चाने हजर होऊन कनिष्ठ लिपीक पदाचा पदभार स्विकारला नाही, तर कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची नियुक्ती रद्द ठरवून त्यांचे नांव निवड यादीतून कमी करणेत येईल.

**सदरील आदेशाचा अंमल सत्वर लागू करणेत येत आहे.**

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः- १२/०९/२०२५.

प्र. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सातारा.

-०-०-०-

जा.क्र. बी/एडीएम/०३/७३६९/२०२५

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :-

०१. मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दहिवडी.
०२. अधिक्षक, प्रशासन/न्यायिक, जिल्हा न्यायालय, सातारा.
०३. श्री. विक्रम दिलीप काकडे, मु.पो. शिंदे कॉलनी, कुमठेफाटा, कोरेगांव, ता. कोरेगांव जि. सातारा ई-मेलद्वारे.
०४. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांक :- १२/०९/२०२५.

**आदेशावरून**

प्र. प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सातारा